भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्गीयांकरिता शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये आरक्षण आणि शैक्षणिक सवलतीसाठी क्रिमी लेअर व जातीचे प्रमाणपत्र देणे.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक - २३ जून, १९९४.

**पहा :-**

१] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी-१०७७/५०८७/का-५ दिनांक २९ मार्च, १९७९ व दि. २४ मे, १९८४ चे शुध्दीपत्रक.

२] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी-१०८५/७४९३२/(२०८३)/बीसीडब्ल्यू-५, दि. ३ डिसेंबर, १९८५.

३] शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-१६८४/गोप. ५९२/(१८९२)/बीसीडब्ल्यू-५, दिनांक १९ फेब्रुवारी, १९८६.

४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४.

५] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक १६ जून, १९९४.

**शासन निर्णय** :- मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण ठेवण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच रिट पिटीशन (सिव्हील) क्रमांक ९३०/१९९० इंदिरा साहनी आणि इतर विरुध्द भारत सरकार आणि इतर यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार इतर मागासवर्गीय जातीमधील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक १६ जून, १९९४ अन्वये निकष निश्चित करण्यात आले आहेत.

२. शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०७७/५०८७/का-५, दिनांक २९ मार्च, १९७९ अन्वये जिल्हा दंडाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांना जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत सक्षम अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे, त्याच सक्षम अधिकाऱ्यांना इतर मागासवर्गीय, भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम जाती आणि भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम जाती यांना जातीचे प्रमाणपत्र व सदर